Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69 ISSN No. 2456-1665

# उदारीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम

**डॉ. वैशाली रा. हजारे**
सहाय्यक प्राध्यापक,
श्रीमती एन.एन.सी. महाविद्यालय, कुसुंबा
ता.जि. धुळे
मो. 9881575244
vaishalihajare14@gmail.com

प्रस्तावना:

ऑगस्ट 1990 मध्ये इराक-कुवेत युद्ध सुरु झाले. जुलै 1999 मध्ये कच्च्या तेलाचे भाव प्रती पिंप 15 डॉलर्स होता. तो ऑक्टोबर 1990 मध्ये 35 डॉलर प्रति पिंप झाला. त्यामुळे भारताची तेल आयातीची रक्कम 60% वाढली. विदेशी कर्जाचा भार, चालु खात्यावरील तुट यामुळे भारताच्या विदेशी गंगाजळीत फार मोठी घट झाली. यामुळे विदेशातून होणारी गुंतवणूकही घटली. भारताजवळील विदेशी चलन साठा हा 1991 मध्ये 1.2 अब्ज डॉलर्स इतकाच राहिला जो येणाऱ्या तीन आठवड्यांची आयात करण्यासही पुरेसा नव्हता.

1990 मध्ये झालेले आखाती युद्ध यामुळे महागाई, वित्तीय असमतोल, व्यवहार तोलातील तुट यामुळे 1990-91 मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेत आर्थिक संकट निर्माण झाले व भारतीय अर्थव्यवस्था 1990 नंतर कमकुवत झाली. आखाती देशांनी तेलाच्या किंमतीत केलेल्या वाढीचा परिणाम अर्थव्यवस्थेवर प्रतिकुल होवू लागला. अर्थव्यवस्थेतील महसुल आणि खर्च यातील अंतर वाढत गेले. भाववाढीने उच्चांक केला. परिणामी भारतीय अर्थव्यव्सथेवर आर्थिक संकट ओढवले. यातुन अर्थव्यवस्थेला बाहेर काढण्यासाठी 1991 मध्ये एक आर्थिक कार्यक्रम राबविण्यात आला. यालाच उदारीकरणाचे धोरण म्हणतात. हे धोरण 1991 मध्ये श्री. नरसिंहराव यांनी डॉ. मनमोहनसिंग यांच्या मार्गदर्शनाखाली राबविले गेले.

*** 1991 मधील अंमलात आलेल्या आर्थिक सुधारणा-**

1) **परवाना पद्धत रद्द करणे-** पूर्वी देशामध्ये उद्योग सुरु करण्यासाठी सरकारकडून परवाना घ्यावा लागत असे. परंतु आर्थिक सुधारणानंतर सर्व उद्योगांना परवाना मुक्त करण्यात आले. त्यामुळे गुंतवणूक वाढीला प्रोत्साहन मिळाले. उदारीकरण म्हणजे सरकारद्वारे लावले गेलेल्या सर्व अनावश्यक नियंत्रण आणि प्रतिबंधांना जसे लाईसेंस, कोटा इ. हटवणे होय.
2) **आयात-निर्यातीवरील निर्बंध दूर करणे-** उदारीकरणाच्या धोरणानुसार आयात निर्यातीवर निर्बंध दूर करण्यात आले. जकातीचे दर कमी करण्यात आले. तसेच सोन्याच्या आयातीवरील निर्बंध काढून टाकण्यात आले.

3) **खाजगीकरण-** 1991-92 पासून सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाचे समभाग खाजगी संस्था वित्तीय संस्था कंपन्या इत्यादींना विकुन स्वत:ची मालकी कमी करण्याचे धोरण स्विकारले. 1991-92 ते 1997-98 या काळात सार्वजनिक क्षेत्रातील समभागाची विक्री करून सरकारने 11,369 कोटी रु. उभारले.

4) **परकीय गुंतवणुकदारांना मुक्त प्रवेश-** सरकारने परकीय गुंतवणूक व तंत्रज्ञान यावरील नियंत्रणे रद्द केली. भारतातील औद्योगिक कंपन्यांच्या समभागात 51% किंवा त्यापेक्षा जास्त भांडवलाची गुंतवणूक करण्याची परवानगी परकीय उद्योगांना देण्यात आली.

5) फेरा कायद्याऐवजी फेमा कायदा करण्यात आला- परकीय चलन व्यवहारावर नियंत्रण ठेवण्यासाठी परकीय चलन नियंत्रण कायदा (FERA) होता. त्याऐवजी परकीय चलनाच्या व्यवहारावर कमीत कमी नियंत्रणे असणारा फेमा (FEMA) कायदा करण्यात आला. रुपयाचे परिवर्तन उदारीकरणाच्या धोरणामुळे विदेशी चलनाच्या व्यवहारावरील नियंत्रण रद्द करण्यात आली. त्याचप्रमाणे रुपया व्यापारखाते व चालु खात्यावर परिवर्तन करण्यात आला. सध्याचा काळात रुपयाचा विनिमय दर मांडणी पुरवठावरून ठरतो.

6) मक्तेदारी नियंत्रण कायदा शिथील करण्यात आला- पूर्वी मक्तेदारी उद्योगातील गुंतवणुकीसंबंधीची कमाल मर्यादा 100 कोटी रुपयांची होती ती रद्द करण्यात आली. त्यामुळे कोणत्याही उद्योगाला आपल्या आकारमानात आपल्या मर्जीनुसार बदल करण्याचे स्वातंत्र्य मिळाले.

**उदारीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम-**

भारत सरकारने 1991 पासून आपल्या देशामध्ये उदारीकरणाचे धोरण स्विकारले. यामुळे भारताचा आर्थिक विकासदर वाढला. परकीय गुंतवणूक वाढली. व्यवसाय करण्याची सुलभता वाढली व देशाचा जलद आर्थिक विकास घडून आला. उदारीकरणाचा भारतीय अर्थ व्यस्थेवर झालेल्या परिणाम पुढीलप्रमाणे सांगता येतो.

**1) कृषीक्षेत्र-**

स्वतंत्र प्राप्तीनंतर बरेच वर्ष आपल्याला आपल्या देशातील लोकांची अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी परदेशातून धान्य आयात करावी लागे. परंतु 1961 नंतर अन्नधान्य सरकारने अन्नधान्य उत्पादनवाढीचे दिर्घकालीन धोरण आखून भारताला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयं:पूर्ण करण्यात आले. पूर्वी सरकारने शेतीसंबंधित उद्योगांना परकीय उद्योगाशी स्पर्धा करता यावी यासाठी संरक्षण दिले होते. खतासाठी तर अनेक कारणासाठी सरकार शेतीला अनुदान देत असे. परंतु उदारीकरणाचे धोरण स्विकारल्यानंतर सरकारच्या शेतीविषयक धोरणात मोठे बदल झाले. उदारीकरणानंतर भारतातून निर्यात होणाऱ्या शेतमालावरील नियंत्रणे दूर झाली. निर्यातीला प्रोत्साहन देण्यात खतांवरील अनुदाने कमी करण्यात आली. सरकारतर्फे खरेदी केल्या जाणाऱ्या धान्याच्या किंमती वाढविण्यात आल्या तसेच शेताला

होणारा वित्तपुरवठा वाढिवला, तसेच 1990-91 मध्ये कृषी मालावरील आयात सीमा शुल्क 106% होते ते 1995-96 मध्ये 26% इतके कमी केले. त्याचप्रमाणे आयातीवरील निर्बंध दूर केले. परिणामत: भारताची निर्यात वाढली. 1993 मध्ये शेतमालाची निर्यात 13091 कोटी होती ती 1996-97 मध्ये 24239 कोटी रु. झाली. 2022-23 मध्ये कृषी निर्यात 43.37 अब्ज डॉलर इतकी झाली. कृषी निर्यात वाढल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले.

**2) औद्योगिक क्षेत्र -**

1991 च्या आर्थिक उदारीकरणाच्या धोरणामुळे औद्योगिक क्षेत्रात आमुलाग्र बदल घडून आला. भारतीय उद्योगाची कार्यक्षमता वाढून उत्पादनात वाढ झाली. परवाना पद्धती रद्द करण्यात आली. सार्वजनिक उद्योगाचे खाजगीकरण करून सरकारने खाजगी उद्योगांना प्रोत्साहन दिले. परकीय गुंतवणुकदारांना भारतीय उद्योगात गुंतवणुक करणे, नवीन उद्योग स्थापन करणे याला प्रोत्साहन दिले गेले. तसेच प्रशुल्कात घट करण्यात आल्याने औद्योगिकरणाला चालना मिळाली. मक्तेदारी कायद्यातील शिथिलतेमुळे अनेक लहान उद्योग मोठ्या उद्योगात विलीन झाले. तसेच तोट्यात चालणारे उद्योग त्वरीत बंद करता येणे शक्य झाले. कामगार कायद्यात बदल करण्यात आले. परिणामत: औद्योगिक विकास दरात वाढ झाली.

**औद्योगिक उत्पादन वृद्धी दर -**

| वर्ष | रुपये अब्ज डॉलर | % जी.डी.पी. च्या |
|---|---|---|
| 1991 | 42.34 | 15.68% |
| 1997 | 68.70 | 16.52% |
| 2000 | 74.31 | 15.31% |
| 2005 | 131.04 | 15.97% |
| 2010 | 285.36 | 17.03% |
| 2015 | 327.82 | 15.58% |
| 2019 | 381.55 | 13.46% |
| 2022 | 456.06 | 13.35% |

संदर्भ- वर्ल्ड बँक, http://www.malrotrends.net

वरील सारणी वरून दिसून येते की, 1991 मध्ये भारतामध्ये होणारे औद्योगिक उत्पादन हे 42.34 अब्ज डॉलर होते ते वाढून 2000 मध्ये 74.31 अब्ज डॉलर झाले तसेच 2022मध्ये 456.06 इतके वाढले उदारीकरणाच्या धोरणामुळे भारतातील औद्योगिक उत्पादनात प्रचंड वाढ झालेली दिसून येते.

**विदेशी व्यापार-**

1991 आर्थिक सुधारणांच्या आधी भारताच्या विदेशी व्यापारावर अनेक बंधने होती. उदारीकरणाचे धोरण स्विकारल्यावरही निर्बंध कमी करण्यात आली. 1991 मध्ये रुपयाचे

अवमूल्यन करण्यात आले. 1994-95 मध्ये रुपया चालू खात्यावर पूर्णपणे परिवर्तन करण्यात आला. आयात शुल्कात घट, निर्यात प्रोत्साहन धोरण यामुळे विदेशी व्यापारात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली.

| वर्ष | निर्यात (अब्ज डॉलर) | आयात (अब्ज डॉलर) |
|---|---|---|
| 1990-91 | 32553 | 43198 |
| 1995-96 | 106353 | 122678 |
| 2000-2001 | 201356 | 228307 |
| 2009-2010 | 845534 | 1363736 |
| 2014-2015 | 1896348 | 2737087 |
| 2022-2023 | 3619292 | 5592877 |

Directorate general of Commercial intelligence %& statistics (DGC1 & S) Kolkata

वरील सारणीतील आकडेवारीवरून दिसून येते की, 1990-91 मध्ये भारताची निर्यात 32553 अब्ज डॉलर होती व आयात 43198 अब्ज डॉलर होती. जी 2022-23 मध्ये उदारीकरणाच्या धोरणामुळे वाढून 3619292 अब्ज डॉलर झाली व आयात 5592877 अब्ज डॉलर झाली.

### 3) परकीय चलन साठा -

उदारीकरणाच्या धोरणामुळे भारताच्या परकीय चलन साठ्यातही वाढ झाली. 1990-91 मध्ये भारताजवळ 223.6 कोटी डॉलरचा परकीय चलन साठा होता. 2010 मध्ये चलन साठ्यात वाढ होवून तो 309.7 शतकोटी डॉलर एवढा वाढला. सरकारने परदेशी व्यापार वाढविण्यासाठी विदेशी व्यापार धोरण पाच वर्षासाठी जाहीर केले. या धोरणामुळे सरकारने 1997 पासून 2700 वस्तुंवरील निर्बंध काढून टाकले. यामुळे भारताची निर्यात वेगाने वाढली. उदारीकरणाच्या धोरणामुळे भारतातील सार्वजनिक उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणात खाजगीकरण करण्यात आले. जे सार्वजनिक उद्योग घाट्यात चालु होते ते बंद करण्यात आले. उदारीकरणाच्या धोरणामुळे भारताचा आर्थिक विकासाचा दर वाढून उत्पादन, उत्पन्न, रोजगारात वाढ झालेली आहे.

### संदर्भ :-

1) http://maharashtratimes.जहल
2) Indiay Economy : Rudra Dutta Sundaram.